भारत सरकार

**विधी, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय**

सत्यमेव जयते

# मानवी हक्क संरक्षण अधिनियम, १९९३

**(१९९४ चा अधिनियम क्रमांक १०)**

[ ६ नोव्हेंबर २००३ रोजी यथाविद्यमान ]

# The Protection of Human Rights Act, 1993

**(Act No. 10 of 1994)**

[ *As in force on the 6th November 2003* ]

www.mpscmantra.com

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन, यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.

२००४

**[किंमत : रुपये ६.००]**

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक ६ नोव्हेंबर २००३ रोजी यथाविद्यमान असलेला दि प्रोटेक्शन ऑफ ह्यूमन राईटस् अॅक्ट, १९९३ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ भारताचे राजपत्र, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १३, अंक १, दिनांक २६ ऑगस्ट २००४ यात पृष्ठ १५ ते २६ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक ६ नोव्हेंबर २००३.

डी. के. विश्वनाथन,
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the Protection of Human Rights Act, 1993 as on the 6th November 2003 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India*, Extraordinary, Part XII, Section 1, No. 1, Vol. 13, dated 26th August 2004 on pages 15 to 26.

This authoritatve text was published under the authority of the President under Section 2, Clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Dated 6th November 2003.

D. K. VISHWANATHAN,
Secretary to the Government of India.

www.mpscmantra.com

# मानवी हक्क संरक्षण अधिनियम, १९९३

## कलमांचा क्रम

कलमे

### प्रकरण एक

### प्रारंभिक

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

२. व्याख्या.

### प्रकरण दोन

### राष्ट्रीय मानवी हक्क आयोग

३. राष्ट्रीय मानवी हक्क आयोग घटित करणे.

४. सभाध्यक्ष व इतर सदस्य यांची नियुक्ती.

५. आयोगाच्या सदस्यास पदावरुन दूर करणे.

६. सदस्यांचा पदावधी.

७. विवक्षित परिस्थितीमध्ये सदस्याने सभाध्यक्ष म्हणून काम करणे किंवा त्यांची कामे पार पाडणे.

८. सदस्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती.

९. आयोगाचे कामकाज, रिक्त जागा इत्यादीमुळे विधिअग्राह्य न ठरणे.

१०. आयोगाने प्रक्रिया विनियमित करणे.

११. आयोगाचे अधिकारी आणि इतर कर्मचारी वर्ग.

### प्रकरण तीन

### आयोगाची कार्ये आणि अधिकार

१२. आयोगाची कार्ये.

१३. चौकशीसंबंधीचे अधिकार.

१४. अन्वेषण.

१५. व्यक्तींनी आयोगाकडे केलेले निवेदन.

१६. पूर्वग्रहामुळे बाधा पोहचलेल्या व्यक्तींचे म्हणणे ऐकून घेणे.

### प्रकरण चार

### कार्यपद्धती

१७. तक्रारींबाबत चौकशी.

१८. चौकशीनंतरची उपाययोजना.

१९. सशस्त्र दलाच्या संबंधात कार्यपद्धती.

२०. आयोगाचे वार्षिक व विशेष अहवाल.

### प्रकरण पाच

### राज्य मानवी हक्क आयोग

२१. राज्य मानवी हक्क आयोगाची घटना.

२२. राज्य आयोगाचा सभाध्यक्ष व इतर सदस्य यांची नियुक्ती.



www.mpscmantra.com

२३. राज्य आयोगाच्या सदस्यास पदावरुन दूर करणे.
२४. राज्य आयोगाच्या सदस्यांचा पदावधी.
२५. सदस्याने, सभाध्यक्ष म्हणून काम पाहणे किंवा त्याची कर्तव्ये पार पाडणे.
२६. राज्य आयोगाच्या सदस्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती.
२७. राज्य आयोगाचे अधिकारी व इतर कर्मचारी.
२८. राज्य आयोगाचे वार्षिक व विशेष अहवाल.
२९. राष्ट्रीय मानवी हक्क आयोगासंबंधातील विवक्षित उपबंध राज्य आयोगांना लागू असणे.

**प्रकरण सहा**

**मानवी हक्क न्यायालये**

३०. मानवी हक्क न्यायालये.
३१. विशेष सरकारी अभियोक्ता.

**प्रकरण सात**

**वित्त व्यवस्था, लेखे आणि लेखापरीक्षा**

३२. केंद्र सरकारकडून अनुदाने.
३३. राज्य शासनाकडून अनुदाने.
३४. लेखे व लेखापरीक्षा.
३५. राज्य आयोगाचे लेखे व लेखापरीक्षा.

**प्रकरण आठ**

**संकीर्ण**

३६. आयोगाच्या अधिकारितेच्या अधीन नसलेल्या बाबी.
३७. विशेष अन्वेषण पथके घटित करणे.
३८. सद्भावपूर्वक केलेल्या कृतीला संरक्षण.
३९. सदस्य व अधिकारी हे लोकसेवक असणे.
४०. केंद्र सरकारचा नियम करण्याचा अधिकार.
४१. राज्य शासनाचा नियम करण्याचा अधिकार.
४२. अडचणी दूर करण्याचा अधिकार.
४३. निरसन आणि व्यावृत्ती.

www.mpscmantra.com

# मानवी हक्क संरक्षण अधिनियम, १९९३

**(१९९४ चा अधिनियम क्रमांक १०)**

(६ नोव्हेंबर, २००३ रोजी यथाविद्यमान)

[८ जानेवारी, १९९४]

**मानवी हक्कांचे अधिक चांगल्या रीतीने संरक्षण करण्यासाठी राष्ट्रीय मानवी हक्क आयोग, राज्यांमध्ये राज्य मानवी हक्क आयोग व मानवी हक्क न्यायालये घटित करण्याकरिता आणि त्यांच्याशी संबंधित किंवा आनुषंगिक अशा बाबींकरिता उपबंध करण्यासाठी अधिनियम.**

भारतीय प्रजासत्ताकाच्या चव्वेचाळिसाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येवो :—

## प्रकरण एक

### प्रारंभिक

१. (१) या अधिनियमास, "मानवी हक्क संरक्षण अधिनियम, १९९३" असे म्हणावे. **संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.**

(२) त्याचा विस्तार संपूर्ण भारतभर आहे :

परंतु, संविधानाच्या सातव्या अनुसूचीतील सूची एक किंवा सूची तीन मध्ये नमूद केलेल्या ज्या कोणत्याही नोंदी जम्मू व काश्मीर राज्याला लागू असतील त्या नोंदींशी संबंधित बाबीसंबंधात हा अधिनियम जेथवर संबंधित असेल तेथवरच तो, जम्मू व काश्मीर राज्याला लागू असेल.

(३) तो, दिनांक २८ सप्टेंबर, १९९३ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

२. (१) या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,— **व्याख्या.**

(क) "सशस्त्र दले" याचा अर्थ, नौसेना, भूसेना व वायुसेना असा असून त्यामध्ये संघ राज्याच्या कोणत्याही अन्य सशस्त्र दलांचा समावेश होतो;

(ख) "सभाध्यक्ष" याचा अर्थ, आयोगाचा किंवा, यथास्थिति, राज्य आयोगाचा सभाध्यक्ष, असा आहे;

(ग) "आयोग" याचा अर्थ, कलम ३ अन्वये घटित केलेला राष्ट्रीय मानवी हक्क आयोग, असा आहे;

(घ) "मानवी हक्क" याचा अर्थ, संविधानाद्वारे हमी दिलेले किंवा आंतरराष्ट्रीय प्रसंविदेमध्ये संनिविष्ट केलेले आणि भारतामध्ये न्यायालयाद्वारे अंमलात आणण्याजोगे असलेले, व्यक्तीचे जीवन, स्वातंत्र्य, समानता व प्रतिष्ठा या संबंधातील हक्क, असा आहे;

(ङ) "मानवी हक्क न्यायालय" याचा अर्थ, कलम ३० अन्वये विनिर्दिष्ट केलेले मानवी हक्क न्यायालय, असा आहे;

(च) "आंतरराष्ट्रीय प्रसंविदा" याचा अर्थ, नागरी व राजकीय हक्कांवरील आंतरराष्ट्रीय प्रसंविदा आणि १६ डिसेंबर, १९६६ रोजी संयुक्त राष्ट्रांच्या महासभेमध्ये स्वीकारण्यात आलेली आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्कांवरील आंतरराष्ट्रीय प्रसंविदा, असा आहे;

(छ) "सदस्य" याचा अर्थ, आयोगाचे, किंवा, यथास्थिति, राज्य आयोगाचे सदस्य, असा असून त्यामध्ये सभाध्यक्षाचा समावेश होतो;

(ज) "राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग" याचा अर्थ, राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग अधिनियम, १९९२ (१९९२ चा १९) याच्या कलम ३ अन्वये घटित केलेला राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग, असा आहे ;

(झ) "अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती राष्ट्रीय आयोग" याचा अर्थ, संविधानाच्या अनुच्छेद ३३८ मध्ये निर्दिष्ट केलेला अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती राष्ट्रीय आयोग, असा आहे ;

(ञ) "राष्ट्रीय महिला आयोग" याचा अर्थ, राष्ट्रीय महिला आयोग अधिनियम, १९९० (१९९० चा २०) याच्या कलम ३ अन्वये घटित केलेला राष्ट्रीय महिला आयोग, असा आहे ;

(ट) "अधिसूचना" याचा अर्थ, शासकीय राजपत्रामध्ये प्रकाशित केलेली अधिसूचना, असा आहे ;

(ठ) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या नियमांद्वारे विहित, असा आहे ;

(ड) "लोकसेवक" याला भारतीय दंड संहितेच्या (१८६० चा ४५) कलम २१ मध्ये नेमून दिलेला अर्थ असेल ;

(ढ) "राज्य आयोग" याचा अर्थ, कलम २१ अन्वये घटित केलेला राज्य मानवी हक्क आयोग, असा आहे.

www.mpscmantra.com

(२) जो कायदा जम्मू व काश्मीर या राज्यामध्ये अंमलात नाही, त्या कायद्याचा या अधिनियमात त्या राज्याच्या संबंधात केलेल्या कोणत्याही उल्लेखाचा अन्वयार्थ, त्या राज्यात जर, कोणताही तत्सम कायदा अंमलात असेल तर, त्या कायद्याचा उल्लेख म्हणून लावला जाईल.

## प्रकरण दोन

## राष्ट्रीय मानवी हक्क आयोग

**राष्ट्रीय मानवी हक्क आयोग घटित करणे.**

३. (१) या अधिनियमान्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करण्यासाठी व सोपवलेली कार्ये पार पाडण्यासाठी केंद्र सरकार "राष्ट्रीय मानवी हक्क आयोग" या नावाने ओळखला जाणारा एक निकाय घटित करील.

(२) आयोगामध्ये पुढील सदस्यांचा समावेश असेल :—

(क) जो सर्वोच्च न्यायालयाचा मुख्य न्यायमूर्ती म्हणून राहिला असेल, असा सभाध्यक्ष ;

(ख) जो सर्वोच्च न्यायालयाचा न्यायाधीश असेल किंवा राहिला असेल, असा एक सदस्य ;

(ग) जो उच्च न्यायालयाचा मुख्य न्यायमूर्ती असेल किंवा राहिला असेल, असा एक सदस्य ;

(घ) मानवी हक्कासंबंधातील बाबींची माहिती असलेल्या किंवा प्रत्यक्ष अनुभव असलेल्या व्यक्तींमधून नियुक्त केलेले दोन सदस्य.

(३) राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग, अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती राष्ट्रीय आयोग आणि राष्ट्रीय महिला आयोग यांवरील सभाध्यक्ष हे, कलम १२ च्या खंड (ख) ते (ज) मध्ये विनिर्दिष्ट केलेली कामे पार पाडण्यासाठी आयोगाचे सदस्य असल्याचे मानण्यात येईल.

(४) आयोगाचा महासचिव हा त्या आयोगाचा मुख्य कार्यकारी अधिकारी असेल आणि आयोग त्याला प्रदान करील अशा आयोगाच्या अधिकारांचा तो वापर करील व अशी कामे पार पाडील.

(५) आयोगाचे मुख्यालय दिल्ली येथे असेल आणि आयोग, केंद्र सरकारची पूर्व परवानगी घेऊन भारतामध्ये इतर कोणत्याही ठिकाणी कार्यालये स्थापन करू शकेल.

**सभाध्यक्ष व इतर सदस्य यांची नियुक्ती.**

४. (१) राष्ट्रपती, आपल्या सहीने व मोहोरनिशी अधिपत्र देऊन सभाध्यक्षाची व इतर सदस्यांची नियुक्ती करील :

परंतु, या पोटकलमा अन्वये प्रत्येक नियुक्ती ही,—

(क) पंतप्रधान .. .. .. .. सभाध्यक्ष ;

(ख) लोकसभेचा अध्यक्ष .. .. .. .. सदस्य ;

(ग) भारत सरकारच्या गृह मंत्रालयाचा प्रभारी मंत्री .. .. सदस्य ;

(घ) लोकसभेतील विरोधी पक्ष नेता .. .. .. सदस्य ;

(ङ) राज्यसभेतील विरोधी पक्ष नेता .. .. .. सदस्य ;

(च) राज्यसभेचा उपाध्यक्ष .. .. .. सदस्य ;

हे मिळून बनलेल्या समितीची शिफारस घेतल्यानंतरच केली जाईल :

परंतु आणखी असे की, भारताच्या मुख्य न्यायमूर्तीशी विचारविनिमय केल्याखेरीज, सर्वोच्च न्यायालयाच्या विद्यमान न्यायाधीशाची किंवा उच्च न्यायालयाच्या विद्यमान मुख्य न्यायमूर्तीची नियुक्ती करण्यात येणार नाही.

(२) सभाध्यक्षाची किंवा सदस्याची नियुक्ती ही, केवळ समितीमध्ये कोणतेही पद रिक्त झाल्याच्या कारणावरून अवैध होणार नाही.

**आयोगाच्या सदस्यास पदावरून दूर करण.**

५. (१) पोटकलम (२) च्या उपबंधांच्या अधीनतेने, आयोगाचा सभाध्यक्ष किंवा अन्य, कोणताही सदस्य याच्या बाबतीत राष्ट्रपतीने सर्वोच्च न्यायालयाकडे निर्देश केल्यावरून त्या न्यायालयाने त्या संबंधात विहित करण्यात आलेल्या कार्य पद्धतीनुसार चौकशी करून नंतर, त्या सभाध्यक्षास किंवा, यथास्थिति, अशा अन्य सदस्यास, शाबीत झालेल्या दुर्वर्तनाच्या किंवा असमर्थतेच्या कारणास्तव पदावरून दूर करावयास पाहिजे, असा अभिप्राय कळवल्यानंतरच, राष्ट्रपतीच्या आदेशाद्वारे अशा कोणत्याही कारणास्तव त्याला त्याच्या पदावरून दूर केले जाईल.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, जर समितीचा सभाध्यक्ष किंवा यथास्थिति, असा अन्य सदस्य जर,—

(क) नादार म्हणून अभिनिर्णीत झाला असेल तर; किंवा

(ख) त्याच्या पदावधीत त्याच्या पदाच्या कर्तव्यांव्यतिरिक्त इतर कोणत्याही वेतनी सेवेत काम करीत असेल तर; किंवा

www.mpscmantra.com

(ग) मानसिक किंवा शारीरिक दुर्बलतेमुळे त्या पदावर राहण्यास अयोग्य ठरत असेल तर ; किंवा

(घ) विकल मनाचा असेल व सक्षम न्यायालयाने तसे घोषित केलेले असेल तर ; किंवा

(ङ) सिद्धदोषी असेल आणि राष्ट्रपतींच्या मते नैतिक अधःपतनाचा अंतर्भाव असलेल्या अपराधासाठी त्याला कारावासाची शिक्षा झालेली असेल तर,

राष्ट्रपती, त्या सभाध्यक्षास किंवा अन्य कोणत्याही सदस्यास आदेशाद्वारे पदावरून दूर करू शकेल.

**सदस्यांचा पदावधी.**

६. (१) सभाध्यक्ष म्हणून नियुक्त झालेली व्यक्ती, ती ज्या दिनांकास आपले पद ग्रहण करील तेव्हापासून पाच वर्षांच्या कालावधीपर्यंत किंवा ती व्यक्ती सत्तर वर्षे वयाची होईपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल त्या घटनेपर्यंत, पद धारण करील.

(२) सदस्य म्हणून नियुक्त झालेली व्यक्ती, ती ज्या दिनांकास आपले पद ग्रहण करील त्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीसाठी आपले पद धारण करील आणि आणखी पाच वर्षांच्या कालावधीसाठी पुनर्नियुक्ति होण्यासाठी पात्र असेल:

परंतु, कोणताही सदस्य त्याने आपल्या वयाची सत्तर वर्षे पूर्ण केल्यानंतर पद धारण करणार नाही.

(३) पद धारण करणे समाप्त झाल्यावर सभाध्यक्ष, किंवा सदस्य हा, भारत सरकारच्या अखत्यारीखाली किंवा कोणत्याही राज्य शासनाच्या अखत्यारीखाली, त्यापुढे नोकरी करण्यास अपात्र असेल.

**विवक्षित परिस्थितीमध्ये सदस्याने सभाध्यक्ष म्हणून काम करणे किंवा त्याची कामे पार पाडणे.**

७. (१) सभाध्यक्षाच्या मृत्यूमुळे, त्याच्या राजीनाम्यामुळे, किंवा अन्य कोणत्याही कारणामुळे त्याचे पद रिक्त झाल्यास अशा प्रसंगी, राष्ट्रपतीस अधिसूचनेद्वारे, सदस्यांपैकी एका सदस्यास, असे रिक्त पद भरण्यासाठी नवीन सभाध्यक्षाची नियुक्ती होईपर्यंत, सभाध्यक्ष म्हणून काम करण्यास प्राधिकृत करता येईल.

(२) जेव्हा अनुपस्थितीमुळे किंवा अन्य कोणत्याही कारणामुळे सभाध्यक्ष आपली कार्ये पार पाडण्यास असमर्थ असेल तेव्हा, राष्ट्रपती या संबंधात अधिसूचनेद्वारे प्राधिकृत करील असा एक सदस्य, सभाध्यक्ष परत कामावर रुजू होण्याच्या दिनांकापर्यंत सभाध्यक्षाची कार्ये पार पाडील.

**सदस्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती.**

८. सदस्यांना प्रदेय असलेले वेतन व भत्ते आणि सेवेच्या इतर अटी व शर्ती या विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील :

परंतु, सदस्यांचे वेतन व भत्ते किंवा सेवेच्या इतर अटी व शर्ती यांमध्ये त्याच्या, नेमणुकीनंतर त्याला बाधक होईल, असा बदल करण्यात येणार नाही.

**आयोगाचे कामकाज, रिक्त जागा इत्यादीमुळे विधिअग्राह्य न ठरणे.**

९. आयोगाची कोणतीही कृती किंवा कार्यवाही केवळ आयोगात कोणतेही पद रिक्त आहे किंवा आयोगाच्या घटनेमध्ये दोष आहे, या कारणावरून प्रश्नास्पद किंवा विधिअग्राह्य ठरणार नाही.

**आयोगाने प्रक्रिया विनियमित करणे.**

१०. (१) सभाध्यक्षास योग्य वाटेल अशावेळी व अशा ठिकाणी आयोगाची बैठक होईल.

(२) आयोग, त्याची स्वतःची प्रक्रिया विनियमित करेल.

(३) आयोगाचे सर्व आदेश आणि निर्णय, महासचिव किंवा सभाध्यक्षाने त्या संदर्भात रीतसर प्राधिकृत केलेला आयोगाचा अन्य अधिकारी अधिप्रमाणित करील.

**आयोगाचे अधिकारी आणि इतर कर्मचारीवर्ग.**

११. (१) केंद्र सरकार, आयोगाला,—

(क) भारत सरकारच्या सचिवाच्या दर्जाचा एक अधिकारी, जो आयोगाचा महासचिव असेल, आणि

(ख) पोलीस महासंचालकाच्या दर्जाहून कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्याच्या हाताखाली आयोगाची कामे सक्षमतेने पार पाडण्यासाठी आवश्यक असेल असा पोलीस व अन्वेषण कर्मचारीवर्ग व इतर अधिकारी व कर्मचारी,

उपलब्ध करून देईल.

(२) केंद्र सरकार त्या बाबतीत तयार करील अशा नियमांना अधीन राहून आयोग आवश्यक असेल असा इतर प्रशासकीय, तांत्रिक आणि वैज्ञानिक कर्मचारीवर्ग नियुक्त करील.

(३) पोटकलम (२) खाली नियुक्त केलेले अधिकारी आणि इतर कर्मचारी यांचे वेतन, भत्ते आणि सेवेच्या शर्ती विहित करण्यात येतील, त्याप्रमाणे असतील.

www.mpscmantra.com

## प्रकरण तीन

### आयोगाची कार्ये आणि अधिकार

**आयोगाची कार्ये.** १२. आयोग पुढीलपैकी सर्व किंवा काही कार्ये पार पाडील :—

(क) खालील तक्रारींमध्ये स्वतःहून, किंवा बळी ठरलेल्या व्यक्तीने किंवा तिच्या वतीने इतर कोणत्याही व्यक्तीने, विनंतीअर्ज केल्यावरून, चौकशी करील :—

(एक) मानवी हक्कांचा भंग किंवा त्यास प्रोत्साहन, किंवा

(दोन) अशा हक्कभंगास प्रतिबंध करण्यास लोक सेवकांकडून झालेला निष्काळजीपणा.

(ख) मानवी हक्कांचा भंग झाल्याचा आरोप असलेल्या व कोणत्याही न्यायालयात प्रलंबित असलेल्या कार्यवाहीत त्या न्यायालयाच्या संमतीने हस्तक्षेप करील ;

(ग) राज्य शासनाच्या नियंत्रणाखाली असलेल्या ज्या कोणत्याही तुरुंगात किंवा अन्य एखाद्या संस्थेत उपचाराच्या, सुधारण्याच्या, किंवा सुरक्षिततेच्या प्रयोजनार्थ व्यक्तीस स्थानबद्ध केलेले किंवा ठेऊन घेण्यात आलेले असेल त्या तुरुंगाला वा संस्थेला, त्या निवासी व्यक्तींच्या जीवन परिस्थितीचा अभ्यास करून त्यावर शिफारशी देण्यासाठी, राज्य शासनास सूचना देऊन भेट देईल.

(घ) संविधानाद्वारे किंवा त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये मानवी हक्काचे संरक्षण करण्यासाठी पुरवण्यात आलेल्या संरक्षक उपायांचा आढावा घेईल व त्यांच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी शिफारशी करील ;

(ङ) मानवी हक्कांच्या वापरात विघ्न आणणाऱ्या घटकांचे, मग ज्यात दहशतवादी कृत्यांचाही समावेश आहे, पुनर्विलोकन करून त्यावर उचित उपाययोजनांची शिफारस करील;

(च) मानवी हक्कांबाबतचे तह व इतर आंतरराष्ट्रीय संलेख यांचा अभ्यास करील आणि त्यांच्या परिणामकारक कार्यान्वियनासाठी शिफारस करील ;

(छ) मानवी हक्कांच्या क्षेत्रात संशोधन कार्य हाती घेईल व त्यास चालना देईल ;

(ज) मानवी हक्कांबाबतची जाण समाजाच्या विविध वर्गांत निर्माण करील आणि प्रकाशने, प्रसार माध्यमे, चर्चासत्रे व इतर उपलब्ध साधने यांद्वारे या मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी उपलब्ध असलेल्या संरक्षक उपाययोजनांची जास्तीत जास्त माहिती करून देईल ;

(झ) अशासकीय संघटना आणि संस्था यांच्या मानवी हक्कांच्या क्षेत्रातील प्रयत्नांना उत्तेजन देईल ;

(ञ) मानवी हक्कांच्या प्रचालनासाठी आवश्यक वाटतील अशी इतर कार्ये करील.

**चौकशीसंबंधीचे अधिकार.** १३. (१) आयोगास, या अधिनियमाखालील तक्रारींची चौकशी करताना दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५) खाली दाव्याची संपरीक्षा करणाऱ्या दिवाणी न्यायालयाला असतील ते, सर्व आणि विशेषतः पुढील बाबी संबंधातील अधिकार असतील :—

(क) साक्षीदाराला उपस्थित राहण्यास फर्मावणे व भाग पाडणे व त्याची शपथेवर तपासणी करणे ;

(ख) कोणतेही दस्तऐवज शोधून काढणे व सादर करणे ;

(ग) शपथपत्रावर पुरावे घेणे ;

(घ) कोणतेही न्यायालय किंवा कार्यालय यांच्याकडून सरकारी अभिलेख किंवा त्याची प्रत मागवणे ;

(ङ) साक्षीदारांची किंवा दस्तऐवजांची तपासणी करण्यासाठी आयोगपत्रे देणे ;

(च) विहित करण्यात येईल अशी अन्य कोणतीही बाब.

(२) आयोगाला, कोणत्याही व्यक्तीस, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याखाली ती व्यक्ती विशेषाधिकाराची हक्क मागणी करीत असेल अशा विशेषाधिकाराच्या अधीन राहून आयोगाच्या मते चौकशीच्या विषय-वस्तूसाठी उपयुक्त असेल अशी किंवा त्याच्याशी संबंधित असेल अशी माहिती पुरवण्यास फर्मावता येईल आणि असे फर्मावण्यात आलेली व्यक्ती, भारतीय दंड संहिता (१८६० चा ४५) याच्या कलम १७६ आणि कलम १७७ च्या अर्थान्तर्गत कायद्याने ती माहिती पुरवण्यास बांधील असल्याचे मानण्यात येईल.

(३) आयोग किंवा आयोगाने याबाबतीत विशेष प्राधिकार दिलेला व राजपत्रित अधिकाऱ्यांच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला इतर कोणताही अधिकारी, जेथे चौकशीच्या विषयाशी संबंधित असे दस्त-ऐवज सापडण्याची शक्यता आहे असे आयोगास सकारण वाटते अशा कोणत्याही इमारतीत किंवा जागेत प्रवेश करील आणि फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याच्या कलम १०० च्या उपबंधांना अधीन राहून असा कोणताही दस्तऐवज जप्त करील किंवा त्यातील लागू असतील असे उतारे घेईल किंवा त्याच्या प्रती घेईल.

www.mpscmantra.com

(४) आयोग हे दिवाणी न्यायालय असल्याचे समजण्यात येईल आणि भारतीय दंड संहिता (१८६० चा ४५) याच्या कलम १७५, कलम १७८, कलम १७९, कलम १८० किंवा कलम २२८ यांमध्ये वर्णिलेल्या अपराधासारखा एखादा अपराध जेव्हा आयोगाच्या समक्ष किंवा उपस्थितीत घडेल तेव्हा, आयोग, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) मध्ये करण्यात आलेल्या तरतुदींनुसार अपराधाची तथ्ये आणि आरोपीची जबानी अभिलिखित केल्यानंतर ते प्रकरण, ज्या दंडाधिकाऱ्यास त्याची संपरीक्षा करण्याची अधिकारिता असेल अशा दंडाधिकाऱ्याकडे पाठवील आणि ज्याकडे असे प्रकरण पाठवण्यात आले असेल तो दंडाधिकारी, जणू काही फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम ३४६ अनुसार त्याच्याकडे ते प्रकरण पाठवण्यात आल्याप्रमाणे त्या आरोपीविरुद्ध करण्यात आलेल्या तक्रारीची सुनावणी चालू करील.

(५) आयोगापुढील प्रत्येक कार्यवाही ही भारतीय दंड संहिता (१८६० चा ४५) याच्या कलम १९३ व २२८ च्या अर्थांतर्गत आणि कलम १९६ च्या प्रयोजनांसाठी न्यायिक कार्यवाही असल्याचे समजण्यात येईल आणि फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याच्या कलम १९५ च्या आणि प्रकरण सव्वीस याच्या सर्व प्रयोजनांसाठी तो आयोग दिवाणी न्यायालय असल्याचे समजण्यात येईल.

१४. (१) आयोग कोणत्याही चौकशीसंबंधात अन्वेषण करण्याच्या प्रयोजनासाठी केंद्र सरकारच्या किंवा कोणत्याही राज्य शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या किंवा अन्वेषण अभिकरणाच्या सेवांचा, यथास्थिति, केंद्र सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या सहमतीने उपयोग करू शकेल. अन्वेषण.

(२) चौकशीशी संबंधित कोणत्याही प्रकरणात अन्वेषण करण्याच्या प्रयोजनासाठी पोटकलम (१), अन्वये ज्यांच्या सेवांचा उपयोग करण्यात आला असेल असा कोणताही अधिकारी किंवा अभिकरण, आयोगाच्या निदेशाच्या व नियंत्रणाच्या अधीन राहून,—

(क) कोणत्याही व्यक्तीस उपस्थित राहण्यास फर्मावील व भाग पाडील आणि त्याची तपासणी करील ;

(ख) कोणताही दस्तऐवज शोधून सादर करण्यास फर्मावील ; आणि

(ग) कोणत्याही कार्यालयामधून सरकारी अभिलेख किंवा त्याची प्रत मागवील.

(३) ज्यांची सेवा पोटकलम (१) अन्वये उपयोगात आणली जाते त्या कोणत्याही अधिकाऱ्या-समोर किंवा अभिकरणासमोर कोणत्याही व्यक्तीने केलेल्या कोणत्याही निवेदनासंबंधात, कलम १५ चे उपबंध, जसे ते एखाद्या व्यक्तीने आयोगासमोर साक्ष देताना केलेल्या कोणत्याही निवेदनासंबंधात लागू होतात, तसेच लागू होतील.

(४) पोटकलम (१) अन्वये ज्या अधिकाऱ्याच्या किंवा अभिकरणाच्या सेवेचा वापर केला असेल ते, चौकशीशी संबंधित कोणत्याही बाबीसंबंधात अन्वेषण करतील आणि त्याचा अहवाल, आयोग त्यासंदर्भात विनिर्दिष्ट करील अशा कालावधीच्या आत आयोगाला सादर करतील.

(५) पोटकलम (४) अन्वये सादर केलेल्या अहवालात नमूद केलेल्या तथ्यांच्या आणि निष्कर्ष असल्यास, त्याच्याही अचूकतेविषयी आयोग स्वतःचे समाधान करून घेईल आणि या प्रयोजनासाठी आयोग त्यास योग्य वाटेल अशी चौकशी करील (त्यात, अन्वेषण करणाऱ्या किंवा अन्वेषणास सहाय्य करणाऱ्या व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या तपासणीचाही अंतर्भाव राहील.)

१५. आयोगापुढे साक्ष देण्याच्या ओघात एखाद्या व्यक्तीने केलेले निवेदन हे, अशा निवेदनाद्वारे खोटी साक्ष देण्याबद्दल होणाऱ्या खटल्याव्यतिरिक्त एरव्ही त्या व्यक्तीला कोणत्याही दिवाणी किंवा फौजदारी स्वरूपाच्या खटल्यात गुंतवणार नाही किंवा त्या व्यक्तीच्या विरुद्ध त्याचा वापर केला जाणार नाही : व्यक्तींनी आयोगाकडे केलेले निवेदन.

परंतु, असे निवेदन,—

(क) आयोगाने त्यास उत्तर देण्यास भाग पाडलेल्या कोणत्याही प्रश्नाच्या उत्तरा-दाखल केलेले असले पाहिजे ; किंवा

(ख) चौकशीच्या विषयवस्तूशी संबंधित असले पाहिजे.

१६. आयोग, चौकशीच्या कोणत्याही टप्प्यावर,— पूर्वग्रहामुळे बाधा पोहचलेल्या व्यक्तींचे म्हणणे ऐकून घेणे.

(क) त्याला जर कोणत्याही व्यक्तीच्या वर्तणुकीबद्दल चौकशी करणे आवश्यक वाटले ; किंवा

(ख) चौकशीमुळे एखाद्या व्यक्तीच्या नावलौकिकास पूर्वग्रहामुळे बाधा पोचण्याची शक्यता आहे असे त्याचे मत झाले,

तर, त्या व्यक्तीला आपले म्हणणे मांडण्याची आणि तिच्या बचावासाठी पुरावे सादर करण्याची वाजवी संधी देऊ शकेल :

परंतु, जेव्हा साक्षीदाराच्या विश्वासाचा अधिक्षेप करण्यात येईल तेव्हा या कलमातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

एच ४०६८—२ (१०३५—१२-०४)

www.mpscmantra.com

## प्रकरण चार

### कार्यपद्धती

तक्रारींबाबत चौकशी.

१७. आयोग, मानवी हक्कभंगाबाबतच्या तक्रारींची चौकशी करताना,—

(एक) केंद्र सरकार किंवा कोणतेही राज्य शासन किंवा त्यांना दुय्यम असणारे इतर कोणतेही प्राधिकरण किंवा संघटना यांच्याकडून तो विनिर्दिष्ट करील त्यावेळेत माहिती किंवा अहवाल मागवील :

परंतु,—

(क) आयोगाने विहित केलेल्या कालावधीत माहिती किंवा अहवाल प्राप्त झाला नाही तर, आयोग स्वत: तक्रारीच्या चौकशीची कार्यवाही करील ;

(ख) आयोगाकडे माहिती किंवा अहवाल प्राप्त झाल्यावर पुढील चौकशीची आवश्यकता नाही किंवा संबंधित शासनाकडून किंवा प्राधिकरणाकडून कार्यवाही सुरू करण्यात आलेली आहे किंवा कार्यवाही करण्यात आली आहे याबाबत आयोगाची खात्री झाली तर, आयोग त्या तक्रारीवर कार्यवाही करणार नाही व तक्रारदारास तसे कळवील.

(दोन) खंड (एक) मध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीस बाध न आणता, तक्रारीचे स्वरूप विचारात घेता चौकशी करणे आवश्यक आहे असे त्यास वाटल्यास चौकशी सुरू करण्यात येईल.

चौकशीनंतरची उपाययोजना.

१८. या अधिनियमाखाली करण्यात आलेली एखादी चौकशी पूर्ण झाल्यानंतर आयोग खालील कोणत्याही उपाययोजना करील, त्या अशा :—

(१) जेथे आयोगाने केलेल्या चौकशीमधून, लोकसेवकाने मानवी हक्कांचा भंग केला किंवा मानवी हक्कांच्या भंगास प्रतिबंध करण्यात हयगय केली, असे दिसून येईल तेथे, आयोग संबंधित शासनास किंवा प्राधिकरणास संबंधित व्यक्तीविरुद्ध किंवा व्यक्तींविरुद्ध, अभियोगाची कार्यवाही सुरू करण्याची किंवा आयोगाला योग्य वाटेल अशी इतर कार्यवाही करण्याची शिफारस करील ;

(२) सर्वोच्च न्यायालयाकडे किंवा संबंधित उच्च न्यायालयाकडे त्यास आवश्यक वाटतील असे निदेश, आदेश किंवा रिट यांकरिता विचारणा करील ;

(३) बळी पडलेल्या व्यक्तीला किंवा त्याच्या कुटुंबातील सदस्यांना, आयोगाला आवश्यक वाटेल असे तात्काळ अंतरिम सहाय्य देण्यासाठी संबंधित शासनाकडे किंवा प्राधिकरणाकडे शिफारस करील ;

(४) खंड (५) च्या उपबंधांना अधीन राहून विनंती अर्जदाराला किंवा त्याच्या प्रतिनिधीला चौकशी अहवालाची प्रत पुरवील ;

(५) आयोग, आपल्या चौकशी अहवालाची प्रत त्याच्या शिफारशींसह संबंधित शासनाकडे किंवा प्राधिकरणाकडे पाठवील आणि संबंधित शासन किंवा प्राधिकरण, एक महिन्याच्या कालावधी-मध्ये किंवा आयोग परवानगी देईल तेवढ्या वाढीव कालावधीमध्ये अहवालावरील आपला शेरा, त्यावर घेतलेल्या कार्यवाहीसह किंवा घ्यावयासाठी प्रस्तावित असलेल्या कार्यवाहीसह, आयोगाकडे सादर करील.

(६) आयोग, संबंधित शासनाच्या किंवा प्राधिकरणाच्या, जर काही असल्यास, भाष्यासह आणि आयोगाच्या शिफारशींवर संबंधित शासनाने किंवा प्राधिकरणाने घेतलेल्या किंवा घ्यावयासाठी प्रस्तावित केलेल्या कार्यवाहीसह आपला चौकशी अहवाल प्रसिद्ध करील.

सशस्त्र दलाच्या संबंधात कार्यपद्धती.

१९. (१) या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, सशस्त्र दलाच्या सदस्यांनी मानवी हक्कांचे उल्लंघन केल्याच्या तक्रारीबाबत कार्यवाही करताना आयोग पुढील कार्यपद्धती स्वीकारील; ती म्हणजे :—

(क) स्वत:हून किंवा विनंती अर्ज आल्यावर केंद्र सरकारकडून अहवाल मिळण्याची मागणी करील ;

(ख) अहवाल प्राप्त झाल्यानंतर, तो एकतर तक्रारीबाबत कार्यवाही करणार नाही, किंवा यथास्थिति, आपल्या शिफारशी शासनाकडे पाठवील.

(२) केंद्र सरकार, आयोगाला, तीन महिन्यांच्या आत किंवा आयोग परवानगी देईल तेवढ्या वाढीव कालावधीमध्ये शिफारशींवर केलेल्या कारवाईबाबत कळवील.

(३) आयोग, केंद्र सरकारकडे केलेल्या शिफारशी आणि अशा शिफारशींवर शासनाने केलेल्या कारवाईसह आपला अहवाल प्रकाशित करील.

(४) आयोग, पोटकलम (३) अन्वये प्रसिद्ध केलेल्या अहवालाची प्रत विनंती अर्जदाराला किंवा त्याच्या प्रतिनिधीला पुरवील.

www.mpscmantra.com

२०. (१) आयोग, केंद्र सरकारला आणि संबंधित राज्य शासनाला वार्षिक अहवाल सादर करील आणि कोणतीही बाब वार्षिक अहवाल सादर करेपर्यंत लांबणीवर टाकण्यात येऊ नये इतक्या तातडीची किंवा महत्त्वाची आहे असे आयोगास वाटत असेल तर, अशा कोणत्याही बाबी संबंधातील विशेष अहवाल आयोग, कोणत्याही वेळी सादर करू शकेल. **आयोगाचे वार्षिक व विशेष अहवाल.**

(२) केंद्र सरकार, आणि यथास्थिति, राज्य शासन, आयोगाचे वार्षिक व विशेष अहवाल, आयोगाच्या शिफारशीनुसार घेतलेल्या किंवा घेण्याचे प्रस्तावित केलेल्या कार्यवाहीच्या ज्ञापनासह, आणि शिफारशी अस्वीकृत केल्यास त्याबाबतच्या कारणांसह, अनुक्रमे संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर किंवा, यथास्थिति, राज्य विधान मंडळाच्या सभागृहासमोर मांडण्याची व्यवस्था करील.

## प्रकरण पाच

### राज्य मानवी हक्क आयोग

२१. (१) राज्य शासन,...............(राज्याचे नाव) मानवी हक्क आयोग म्हणून ओळखला जाणारा निकाय, या प्रकरणाअन्वये राज्य आयोगाला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि त्याला नेमून देण्यात आलेली कार्ये पार पाडण्यासाठी, घटित करू शकेल. **राज्य मानवी हक्क आयोगाची घडण.**

(२) राज्य आयोग—

(क) सभाध्यक्ष, जो उच्च न्यायालयाचा मुख्य न्यायमूर्ती असेल ;

(ख) एक सदस्य, जो उच्च न्यायालयाचा न्यायाधीश आहे किंवा होता ;

(ग) एक सदस्य, जो त्या राज्यामध्ये जिल्हा न्यायाधीश आहे किंवा होता ;

(घ) मानवी हक्कासंबंधातील प्रकरणातील ज्ञान किंवा व्यवहारीक अनुभव असलेल्या व्यक्तींमधून नियुक्त करावयाचे दोन सदस्य,

यांचा मिळून बनेल.

(३) या आयोगात एक सचिव असेल, जो राज्य आयोगाचा मुख्य कार्यकारी अधिकारी असेल आणि तो, राज्य आयोग, त्याच्याकडे प्रत्यायुक्त करील असे अधिकार वापरील व तशी कार्ये पार पाडील.

(४) राज्य शासन अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा ठिकाणी राज्य आयोगाचे मुख्यालय असेल.

(५) राज्य आयोग, फक्त संविधानाच्या सातव्या अनुसूचीमधील सूची दोन व सूची तीन मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही नोंदींच्या संदर्भातील असतील अशा बाबींच्या संबंधातच मानवी हक्कांच्या उल्लंघनाची चौकशी करील :

परंतु, जर अशा बाबतीत या आयोगाने किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये घटित केलेल्या इतर कोणत्याही आयोगाने आधीच चौकशी केलेली असेल तर, राज्य आयोग त्या बाबतीत चौकशी करणार नाही :

परंतु आणखी असे की, जम्मू आणि काश्मीर मानवी हक्क आयोगाच्या संबंधात हे पोट-कलम, जणू काही "संविधानाच्या सातव्या अनुसूचीमधील सूची दोन आणि सूची तीन मध्ये नमूद केलेल्या" या मजकुराऐवजी "जम्मू व काश्मीर राज्याला लागू असल्याप्रमाणे संविधानाच्या सातव्या अनुसूचीमधील सूची तीन मध्ये नमूद केलेल्या व ज्या संबंधात त्या राज्याच्या विधान मंडळाला कायदे करण्याचा अधिकार आहे, त्या" हा मजकूर दाखल केला असल्याप्रमाणे, प्रभावी होईल.

२२. (१) राज्यपाल त्यांच्या सहीशिक्क्यानिशी असलेल्या अधिपत्राद्वारे सभाध्यक्ष व इतर सदस्य यांची नियुक्ती करील : **राज्य आयोगाचा सभाध्यक्ष व इतर सदस्य यांची नियुक्ती.**

परंतु, या पोट-कलमान्वये करावयाची प्रत्येक नियुक्ती ही पुढील सदस्यांचा समावेश असलेल्या समितीची शिफारस मिळाल्यानंतर करण्यात येईल :—

(क) मुख्य मंत्री—सभाध्यक्ष

(ख) विधान सभेचा अध्यक्ष—सदस्य

(ग) त्या राज्यातील गृह विभागाचा प्रभारी मंत्री—सदस्य

(घ) विधान सभेतील विरोधी पक्षनेता—सदस्य:

परंतु आणखी असे की, ज्या राज्यामध्ये विधान परिषद असेल तेथे त्या परिषदेचा सभापती व त्या परिषदेतील विरोधी पक्ष नेता हे देखील समितीचे सदस्य असतील :

परंतु तसेच, संबंधित राज्याच्या उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशाशी विचारविनिमय केल्याखेरीज उच्च न्यायालयाच्या पीठासीन न्यायाधीशाची किंवा पीठासीन जिल्हा न्यायाधीशाची नियुक्ती करण्यात येणार नाही.

(२) केवळ समितीमध्ये कोणतेही रिक्त पद आहे याच कारणास्तव, राज्य आयोगाच्या सभाध्यक्षाची किंवा सदस्याची नियुक्ती विधिअग्राह्य मानण्यात येणार नाही.



www.mpscmantra.com

**राज्य आयोगाच्या सदस्यास पदावरून दूर करणे.**

२३. (१) पोट-कलम (२) च्या उपबंधांच्या अधीनतेने, राज्य आयोगाचा सभाध्यक्ष किंवा राज्य आयोगाचा अन्य कोणताही सदस्य याच्या बाबतीत, राष्ट्रपतीने सर्वोच्च न्यायालयाकडे निर्देश केल्यावरून त्या सर्वोच्च न्यायालयाने, त्यासंबंधात विहित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीनुसार रीतसर चौकशी चालवून नंतर त्या सभाध्यक्षास किंवा यथास्थिति, अशा अन्य सदस्यास शाबीत झालेल्या दुर्वर्तनाच्या किंवा असमर्थतेच्या कारणास्तव पदावरून दूर करावयास पाहिजे, असा अभिप्राय सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतरच, राष्ट्रपतींच्या आदेशाद्वारे, अशा कोणत्याही कारणास्तव त्याला त्याच्या पदावरून काढून टाकले जाईल.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, सभाध्यक्ष किंवा यथास्थिति, असा अन्य सदस्य जर,—

(क) नादार म्हणून अभिनिर्णित झाला असेल तर ; किंवा

(ख) आपल्या पदावधीत आपल्या पदाच्या कर्तव्यांव्यतिरिक्त इतर कोणतेही काम सवेतन करील तर ; किंवा

(ग) मानसिक किंवा शारीरिक दुर्बलतेमुळे त्या पदावर राहण्यास अयोग्य असेल तर ; किंवा

(घ) विकलमनाचा असेल व सक्षम न्यायालयाने तसे घोषित केले असेल तर ; किंवा

(ङ) राष्ट्रपतींच्या मते, ज्यात नैतिक अधःपतनाचा अंतर्भाव आहे अशा एखाद्या अपराधामध्ये सिद्धदोषी ठरलेला असून त्यास कारावासाची शिक्षा झालेली असेल तर,

राष्ट्रपती त्यास त्याच्या पदावरून दूर करू शकेल.

**राज्य आयोगाच्या सदस्यांचा पदावधी.**

२४. (१) ज्या व्यक्तीची सभाध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आलेली असेल, ती ज्या दिनांकास आपले पद धारण करील त्या दिनांकापासून पाच वर्षे किंवा तिच्या वयाला सत्तर वर्षे पूर्ण होतील तो दिनांक, यांपैकी जे अगोदरचे असेल तेवढ्या कालावधीपर्यंत आपले पद धारण करील.

(२) ज्या व्यक्तीची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आलेली असेल ती ज्या दिनांकास आपले पद धारण करील त्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीसाठी पद धारण करील आणि आणखी पाच वर्षांच्या कालावधीसाठी पुनर्नियुक्तीस ती पात्र राहील :

परंतु, कोणताही सदस्य त्याच्या वयाला सत्तर वर्षे पूर्ण झाल्यानंतर पद धारण करणार नाही.

(३) सभाध्यक्षाला किंवा सदस्याला, त्याचे पद धारण करण्याचे संपुष्टात आल्यानंतर राज्य शासन किंवा केंद्र सरकार यांच्या नियंत्रणाखाली पुढील नियुक्तीस पात्र असणार नाही.

**सदस्याने, विशिष्ट परिस्थितीत सभाध्यक्ष म्हणून काम पाहणे किंवा त्याची कर्तव्ये पार पाडणे.**

२५. (१) सभाध्यक्षाचे निधन झाल्याने, त्याने राजीनामा दिल्याने किंवा अन्य कोणत्याही कारणाने त्याचे पद रिक्त झाल्यास त्या प्रसंगी राज्यपाल, अधिसूचनेद्वारे, असे रिक्त पद भरण्यासाठी नव्या सभाध्यक्षाची नियुक्ती होईपर्यंत, एखाद्या सदस्याला त्या पदाची कामे पार पाडण्यास प्राधिकृत करील.

(२) जेव्हा, सभाध्यक्ष रजेवर असल्यामुळे किंवा अन्य कारणास्तव अनुपस्थित असल्याने आपली कर्तव्ये पार पाडण्यास असमर्थ असेल तेव्हा, राज्यपाल अधिसूचनेद्वारे या संदर्भात प्राधिकृत करील असा अन्य एक सदस्य, सभाध्यक्ष रजेवरून परत रूजू होईपर्यंतच्या दिनांकापर्यंत सभाध्यक्षाची कर्तव्ये पार पाडील.

**राज्य आयोगाच्या सदस्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती.**

२६. सदस्यांना द्यावयाचे वेतन व भत्ते आणि सेवेच्या इतर अटी व शर्ती राज्य शासनाकडून विहित करण्यात येईल त्यानुसार असतील :

परंतु, सदस्याच्या नियुक्तीनंतर त्याचे वेतन व भत्ते आणि त्याच्या सेवेच्या इतर अटी व शर्ती यात, त्याचा तोटा होईल अशा प्रकारचा कोणताही बदल करण्यात येणार नाही.

**राज्य आयोगाचे अधिकारी व इतर कर्मचारी.**

२७. (१) राज्य शासन आयोगाला,—

(क) राज्य शासनाच्या सचिव या पदापेक्षा कमी दर्जाचे पद नसलेला एक अधिकारी, जो राज्य आयोगाचा सचिव असेल ; आणि

(ख) पोलीस महानिरीक्षकाच्या पदापेक्षा कमी दर्जाचे पद नसलेल्या अधिकाऱ्याच्या हाताखाली पोलीस व अन्वेषण कर्मचारी वर्ग आणि राज्य आयोगाची कामे क्षमतापूर्वक पार पाडण्यासाठी आवश्यक असलेला इतर अधिकारी व कर्मचारी वर्ग,

उपलब्ध करून देईल.

(२) राज्य शासन या संदर्भात करील अशा नियमांना अधीन राहून, राज्य आयोग त्याला आवश्यक असेल असा इतर प्रशासकीय, तांत्रिक आणि वैज्ञानिक कर्मचारी वर्ग नियुक्त करू शकेल.

(३) पोट-कलम (२) अन्वये नियुक्त करण्यात आलेले अधिकारी व कर्मचारी यांची वेतने, भत्ते आणि सेवेच्या अटी, राज्य शासन विहित करील त्याप्रमाणे असतील.

www.mpscmantra.com

**राज्य आयोगाचे वार्षिक व विशेष अहवाल.**

२८. (१) राज्य आयोग, राज्य शासनाला वार्षिक अहवाल सादर करील आणि कोणतीही बाब राज्य आयोगाचे वार्षिक अहवाल सादर करीपर्यंत लांबणीवर टाकण्यात येऊ नये इतक्या तातडीची किंवा महत्त्वाची आहे, असे आयोगास वाटत असेल तर, अशा कोणत्याही बाबींसंबंधातील विशेष अहवाल, राज्य आयोग कोणत्याही वेळी सादर करील.

(२) राज्य शासन, राज्य आयोगाचे वार्षिक व विशेष अहवाल, जेथे राज्य विधान मंडळ दोन सभागृहांचे मिळून बनलेले असेल तेथे, त्याच्या प्रत्येक सभागृहासमोर, किंवा जेथे ते एका सभागृहाचे मिळून बनलेले असेल तेथे त्या, सभागृहासमोर, राज्य आयोगाकडून शिफारशींवर करण्यात आलेल्या किंवा प्रस्तावित केलेल्या कार्यवाहीच्या ज्ञापनासह आणि शिफारशी अस्वीकृत केल्यास त्याबाबतच्या कारणांसह, मांडण्याची व्यवस्था करील.

**राष्ट्रीय मानवी हक्क आयोगासंबंधातील विवक्षित उपबंध राज्य आयोगांना लागू करणे.**

२९. कलमे ९, १०, १२, १३, १४, १५, १६, १७ आणि १८ यांचे उपबंध राज्य आयोगाला लागू असतील आणि खालील फेरबदलाच्या अधीनतेने ते प्रभावी होतील :—

(क) "आयोग" या उल्लेखाचा अन्वयार्थ "राज्य आयोग" असा लावण्यात येईल ;

(ख) कलम १० च्या पोट-कलम (३) मध्ये "महासचिव" या शब्दाऐवजी "सचिव" हा शब्द दाखल करण्यात येईल ;

(ग) कलम १२ चा खंड (च) वगळण्यात येईल ;

(घ) कलम १७ च्या खंड (एक) मधील "केंद्र सरकार किंवा कोणतेही" हे शब्द वगळण्यात येतील.

## प्रकरण सहा

### मानवी हक्क न्यायालये

**मानवी हक्क न्यायालये.**

३०. राज्य शासन, मानवी हक्कांच्या उल्लंघनाबाबत उद्भवणाऱ्या अपराधांची संपरीक्षा त्वरेने होण्याच्या प्रयोजनासाठी, उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशाच्या सहमतीने अधिसूचनेद्वारे प्रत्येक जिल्ह्याकरिता, उक्त अपराधांची संपरीक्षा करण्यासाठी सत्र न्यायालय हे मानवी हक्क न्यायालय असल्याचे विनिर्दिष्ट करील :

परंतु, त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अन्य कायद्यान्वये अशा अपराधांसाठी जर,—

(क) सत्र न्यायालय हे विशेष न्यायालय असल्याचे आधीच विनिर्दिष्ट केले असेल ; किंवा

(ख) विशेष न्यायालय आधीच घटित करण्यात आलेले असेल,

तर या कलमातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

**विशेष सरकारी अभियोक्ता.**

३१. राज्य शासन, अधिसूचनेद्वारे, प्रत्येक मानवी हक्क न्यायालयासाठी, त्या न्यायालयात खटले चालवण्याच्या प्रयोजनाकरिता, सरकारी अभियोक्ता विनिर्दिष्ट करील किंवा ज्याने सात वर्षांपेक्षा कमी नाही इतक्या कालावधीसाठी अभियोक्ता म्हणून व्यवसाय केलेला असेल, अशा अभियोक्त्याची विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्ती करील.

## प्रकरण सात

### वित्तव्यवस्था, लेखे आणि लेखापरीक्षा

**केंद्र सरकारकडून अनुदाने.**

३२. (१) केंद्र सरकार, संसदेकडून या बाबतीतील कायद्याद्वारे योग्य विनियोजन करण्यात आल्यानंतर, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी उपयोजित करण्याकरिता केंद्र सरकारला योग्य वाटेल इतकी रक्कम अनुदानाच्या मार्गाने आयोगाला देईल.

(२) या अधिनियमाखालील कार्ये पार पाडण्यासाठी आयोगाला योग्य वाटेल एवढी रक्कम आयोग खर्च करील आणि ती रक्कम पोट-कलम (१) मध्ये निर्देशित केलेल्या अनुदानामधून देय असलेला खर्च असल्याचे मानण्यात येईल.

**राज्य शासनाकडून अनुदाने.**

३३. (१) राज्य शासन, विधानमंडळाकडून या बाबतीतील कायद्याद्वारे विनियोजन करण्यात आल्यानंतर या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी उपयोजित करण्याकरिता राज्य शासनाला योग्य वाटेल इतकी रक्कम अनुदानाच्या मार्गाने आयोगाला देईल.

(२) प्रकरण पाच खालील कार्ये पार पाडण्यासाठी राज्य आयोगाला योग्य वाटेल एवढी रक्कम आयोग खर्च करील आणि ती रक्कम, पोट-कलम (१) मध्ये निर्देशित केलेल्या अनुदानामधून देय असलेला खर्च असल्याचे मानण्यात येईल.

**लेखे व लेखापरीक्षा.**

३४. (१) आयोग, यथोचित लेखे व इतर संबद्ध अभिलेख ठेवील आणि केंद्र सरकार, भारताचे नियंत्रक व महा लेखापरीक्षक यांच्याशी विचारविनिमय करून विहित करील अशा नमुन्यात, लेख्यांचे वार्षिक विवरण तयार करील.

www.mpscmantra.com

(२) नियंत्रक व महा लेखापरीक्षक, त्याच्याकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालांतराने आयोगाच्या लेख्याची लेखापरीक्षा करील आणि अशा लेख्यांच्या लेखापरीक्षेसाठी होणारा कोणताही खर्च आयोगाकडून, नियंत्रक व महा लेखापरीक्षक यांना देय राहील.

(३) नियंत्रक व महा लेखापरीक्षक आणि आयोगाच्या लेख्यांची लेखापरीक्षा करण्यासंबंधात या अधिनियमान्वये त्याच्याकडून नियुक्त करण्यात आलेली कोणतीही व्यक्ती यांना, नियंत्रक व महा लेखापरीक्षक यांना शासकीय लेख्यांची लेखापरीक्षा करण्यासंबंधात सामान्यतः जे अधिकार, विशेषाधिकार व प्राधिकार असतात तेच अधिकार, विशेषाधिकार व प्राधिकार अशा लेखापरीक्षेसंबंधात असतील आणि विशेषतः वह्या, लेखे, संबद्ध प्रमाणके व अन्य दस्तऐवज व कागदपत्रे सादर करण्यास सांगण्याचा व आयोगाच्या कोणत्याही कार्यालयाचे निरीक्षण करण्याचा त्यांना हक्क असेल.

(४) नियंत्रक व महा लेखापरीक्षक किंवा त्याच्यावतीने नियुक्त करण्यात येईल अशी अन्य व्यक्ती यांनी प्रमाणित केलेले आयोगाचे लेखे, त्यावरील लेखापरीक्षा अहवालासह प्रत्येक वर्षी आयोगाकडून केंद्र सरकारकडे पाठवण्यात येतील आणि केंद्र सरकार ते प्राप्त झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडण्याची व्यवस्था करील.

रा आयोगाचे लेखे व लेखापरीक्षा.

३५. (१) राज्य आयोग, यथोचित लेखे व इतर संबद्ध अभिलेख ठेवील व राज्य शासन, भारताचे नियंत्रक व महा लेखापरीक्षक यांच्याशी विचारविनिमय करून विहित करील अशा नमुन्यात लेख्यांचे वार्षिक विवरण तयार करील.

(२) नियंत्रक व महा लेखापरीक्षक, त्याच्याकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालांतराने राज्य आयोगाच्या लेख्यांची लेखापरीक्षा करील आणि अशा लेख्यांच्या लेखापरीक्षेसाठी होणारा कोणताही खर्च, राज्य आयोगाकडून नियंत्रक व महा लेखापरीक्षक यांना देय राहील.

(३) नियंत्रक व महा लेखापरीक्षक, आणि राज्य आयोगाच्या लेख्यांची लेखापरीक्षा करण्यासंबंधात या अधिनियमान्वये त्याच्याकडून नियुक्त करण्यात आलेली कोणतीही व्यक्ती यांना, नियंत्रक व महा लेखापरीक्षक यांना शासकीय लेख्यांची लेखापरीक्षा करण्यासंबंधात सामान्यतः जे अधिकार, विशेषाधिकार व प्राधिकार असतात तेच अधिकार, विशेषाधिकार व प्राधिकार अशा लेखापरीक्षासंबंधात असतील आणि विशेषतः वह्या, लेखे, संबद्ध प्रमाणके व अन्य दस्तऐवज व कागदपत्रे सादर करण्यास सांगण्याचा व राज्य आयोगाच्या कोणत्याही कार्यालयाचे निरीक्षण करण्याचा त्यांना हक्क असेल.

(४) नियंत्रक व महा लेखापरीक्षक किंवा त्याच्या वतीने नियुक्त करण्यात येईल अशी अन्य व्यक्ती यांनी प्रमाणित केलेले राज्य आयोगाचे लेखे, त्यावरील लेखापरीक्षा अहवालासह प्रत्येक वर्षी राज्य आयोगाकडून राज्य शासनाकडे पाठवण्यात येतील आणि राज्य शासन, ते प्राप्त झाल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडण्याची व्यवस्था करील.

## प्रकरण आठ

### संकीर्ण

गाच्या अधि-तेच्या अधीन सलेल्या बाबी.

३६. (१) आयोग, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये रीतसर घटित करण्यात आलेल्या राज्य आयोगासमोर किंवा कोणत्याही अन्य आयोगासमोर प्रलंबित असलेल्या कोणत्याही बाबींच्या संबंधात चौकशी करणार नाही.

(२) आयोग किंवा राज्य आयोग, मानवी हक्कांच्या उल्लंघनाबाबतची कृती ज्या दिनांकास घडल्याचे अभिकथित करण्यात आले असेल त्या दिनांकापासून एक वर्षाचा कालावधी संपल्यानंतर, त्या बाबीसंबंधात चौकशी करणार नाही.

शेष अन्वेषण घटित करणे.

३७. त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अन्य कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी शासनास, तसे करणे आवश्यक आहे असे वाटल्यास, शासन मानवी हक्कांच्या उल्लंघनामुळे निर्माण होणाऱ्या अपराधांच्या अन्वेषणाच्या व खटल्याच्या प्रयोजनांसाठी, त्यास आवश्यक वाटतील अशा पोलीस अधिकाऱ्यांची मिळून बनलेली, एक किंवा अधिक विशेष अन्वेषण पथके घटित करील.

र्वक केलेल्या ला संरक्षण.

३८. या अधिनियमास किंवा कोणत्याही नियमास किंवा त्या खाली काढण्यात आलेल्या कोणत्याही आदेशास अनुलक्षून केंद्र सरकार, राज्य शासन, आयोग, राज्य आयोग किंवा त्याचा कोणताही सदस्य किंवा केंद्र सरकार, राज्य शासन, आयोग किंवा राज्य आयोग यांच्या निदेशानुसार काम करणारी कोणतीही व्यक्ती, यांनी सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे उद्देशित असलेल्या कोणत्याही कृतीच्या संबंधात किंवा केंद्र सरकार, राज्य शासन, आयोग किंवा राज्य आयोग यांनी किंवा त्यांच्या प्राधिकारान्वये प्रकाशित केलेल्या कोणत्याही अहवालाच्या कागदपत्रांच्या, किंवा कार्यवाहीच्या संबंधात त्यांच्या विरुद्ध कोणताही दावा किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल केली जाणार नाही.

www.mpscmantra.com

३९. आयोग, राज्य आयोग याचा प्रत्येक सदस्य आणि आयोग किंवा राज्य आयोग यांच्याकडून या अधिनियमाखालील कार्ये पार पाडण्यासाठी नियुक्त करण्यात आलेला किंवा प्राधिकृत करण्यात आलेला प्रत्येक अधिकारी हा, भारतीय दंड संहिता, (१८६० चा ४५) याच्या कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल. **सदस्य व अधिकारी हे लोकसेवक असणे.**

४०. (१) केंद्र सरकारला, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, अधिसूचनेद्वारे नियम करता येतील. **केंद्र सरकारचा नियम करण्याचा अधिकार.**

(२) विशेषत: आणि पूर्वगामी अधिकाराच्या सर्वसाधारणतेस बाध न येता, अशा नियमांमध्ये पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबीसाठी उपबंध करता येतील :—

(क) कलम ८ अन्वये सदस्यांची वेतने व भत्ते आणि सेवेच्या इतर अटी व शर्ती ;

(ख) कलम ११, पोटकलम (३) अन्वये आयोगाकडून इतर प्रशासकीय, तांत्रिक व वैज्ञानिक कर्मचारीवर्ग ज्याच्या अधीनतेने नियुक्त करण्यात येईल, त्या अटी आणि अधिकारी व इतर कर्मचारीवर्गाची वेतने व भत्ते ;

(ग) कलम १३, पोटकलम (१) च्या खंड (च) अन्वये, दिवाणी न्यायालयाचे जे कोणतेही इतर अधिकार विहित करणे आवश्यक असेल ते अधिकार ;

(घ) कलम ३४, पोटकलम (१) अन्वये आयोगाने लेख्यांचे वार्षिक विवरण ज्या नमुन्यात तयार करावयाचे तो नमुना ; आणि

(ङ) विहित करावयाची किंवा करता येईल अशी अन्य कोणतीही बाब.

(३) या अधिनियमाखाली केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना ठेवला जाईल, आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले, अथवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहाचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम, अशा आपरिवर्तित रुपातच परिणामक होईल, किंवा यथास्थिति, मुळीच परिणामक होणार नाही ; तथापि, अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.

[1]["४०क. कलम ४०, पोट-कलम (२), खंड (ख) अन्वये नियम करण्याच्या अधिकारात, असे नियम किंवा त्यांपैकी कोणताही नियम, या अधिनियमास राष्ट्रपतीची मान्यता मिळाल्याच्या दिनांकापूर्वीचा नसेल अशा दिनांकापासून भूतलक्षी प्रभावाने करण्याच्या अधिकाराचा अंतर्भाव असेल ; परंतु, ज्या व्यक्तीला तो नियम लागू होतो अशा एखाद्या व्यक्तीच्या हितसंबंधास जेणेकरून बाध येईल असा भूतलक्षी प्रभाव त्या नियमास देण्यात येणार नाही."] **भूतलक्षी प्रभावाने नियम करण्याचा अधिकार.**

४१. (१) राज्य शासनाला, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, अधिसूचनेद्वारे नियम करता येतील. **राज्य शासनाचा नियम करण्याचा अधिकार.**

(२) विशेषत: आणि पूर्वगामी अधिकाराच्या सर्वसाधारणतेस बाध न येता, अशा नियमांमध्ये पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबीसाठी उपबंध करता येतील :—

(क) कलम २६ अन्वये सदस्यांची वेतने व भत्ते आणि सेवेच्या इतर अटी व शर्ती,

(ख) कलम २७, पोटकलम (३) अन्वये, राज्य आयोगाकडून इतर प्रशासकीय, तांत्रिक वैज्ञानिक कर्मचारी वर्ग ज्याच्या अधीनतेने नियुक्त करण्यात येईल त्या अटी आणि अधिकारी व कर्मचारी वर्गाची वेतने व भत्ते ;

(ग) कलम ३५, पोटकलम (१) अन्वये ज्या नमुन्यात लेख्यांची वार्षिक विवरणे तयार करावयाची तो नमुना.

(३) राज्य शासनाने, या कलमाच्या अधीनतेने केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर, जेथे राज्य विधानमंडळ दोन सभागृहांचे असेल तेथे त्या विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे, किंवा असे विधानमंडळ एका सभागृहाचे असेल तेथे त्या सभागृहापुढे ठेवण्यात येईल.

४२. (१) या अधिनियमाचे उपबंध अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवली तर, केंद्र सरकारला ती अडचण दूर करण्यासाठी, त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटतील असे, या अधिनियमाच्या उपबंधांशी विसंगत नसलेले उपबंध, **शासकीय राजपत्रात,** प्रकाशित केलेल्या आदेशाद्वारे करता येतील: **अडचणी दूर करण्याचा अधिकार.**

परंतु, या अधिनियमाचा प्रारंभ झाल्याच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर असा कोणताही आदेश काढता येणार नाही.

(२) या कलमान्वये काढण्यात आलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर शक्य होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

---

१. २००० चा अधिनियम, ४९, कलम २ द्वारे दाखल केले (११ डिसेंबर, २००० रोजी व तेव्हापासून).

www.mpscmantra.com

निरसन आणि व्यावृत्ती.

४३. (१) मानवी हक्क संरक्षण अध्यादेश, १९९३ (१९९३ चा अध्यादेश ३०) हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(२) असे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा केलेली कोणतीही कारवाई, या अधिनियमाच्या तत्सम उपबंधान्वये केल्याचे किंवा कारवाई केल्याचे मानण्यात येईल.

रा

www.mpscmantra.com

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई